# वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर

**मुख्य प्रशासकीय इमारत, नवीन विक्रीकर कार्यालय, बिडको रस्ता, नवली, ता.जि.पालघर**

**दुरध्वनी क्र. ०२५२५-२९७००३** **e-mail : cafozp.palghar@gmail.com**


**प्रेषण प्रमाणपत्र घेऊन**

जा.क्र.पाजिप/अर्थ/वित्त समिती/वशी/ १८१
वित्त विभाग, जि.प. पालघर
दिनांक :३१/१०/२०१७.

**नोटीस**

या पत्रान्वये पालघर जिल्हा परिषद अर्थ समितीचे सन्माननीय सदस्य मा.श्री./श्रीम.____________________________ मुक्काम__________ पोस्ट__________ तालुका__________ जिल्हा पालघर यांस कळविण्यांत येते की अर्थ समितीची सभा **बुधवार दिनांक ०८.११.२०१७ रोजी दुपारी १२.००** वाजता **संकुल सभागृह पंचायत समिती पालघर** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस हजर राहणेस विनंती आहे.

**टिप** :- गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्यातासाने सभा घेतली जाईल.

**मा.सभापती अर्थ समिती यांचे मान्यतेनुसार.**

**सही/-**
**मा. सभापती अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद पालघर**

**विषय पत्रिका :**

विषय क्र. १ (अ) - मागील अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.
(ब) - मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अंमलबजावणीबाबत.
विषय क्र. २. जिल्हा परिषद पालघरच्या माहे ऑगस्ट २०१७ च्या मासिक जमा/खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.
विषय क्र. ३. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रत माहितीसाठी सादर.**

१.मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
२.मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.
४.मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.

# अर्थ समिती सभा दिनांक १३.१०.२०१७
## इतिवृत्त भाग -१

| अ.क्रं. | सभेस उपस्थित पदाधिकारी | सभेस उपस्थित अधिकारी व कर्मचारी |
|---|---|---|
| १) | **मा.श्री.निलेश रमेश गंधे**<br>**सभापती, अर्थ समिती, जि.प.पालघर** | १) श्री. एस.पी.पतंगे, सचिव तथा मु.ले.व वि.अ., जि.प.पालघर<br>२) श्री.प्रकाश देवऋषी, उप मु.का.अ.(सामान्य प्रशासन) |
| २) | मा.श्री.रामा जानु ठाकरे, सदस्य | ३) श्री. प्र. म. वैवुडे, लेखाधिकारी (१),वित्त विभाग |
| ३) | मा.श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्य | ४) श्री. बा.र. भोये,लेखाधिकारी (2),वित्त विभाग |
| ४) | मा.श्री. सुरेश बाबु कोरडा, सदस्य | ५) श्री.एस.आर.वंजारी, स.ले.अ, वित्त विभाग |
| ५) | मा. श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्य | ६) श्री.एस.एन.साबळे, क.ले.अ, वित्त विभाग |
| ६) | मा.श्री.सुरेश ठक्या तरे, सदस्य | ७) श्री.राकेश वाणी, कृषि विकास अधिकारी |
| ७) | मा.श्री. प्रदिप महादेव वाघ, सदस्य | |
| ८) | मा. श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्य | |
| ९) | मा. श्री.किशोर बारकू बरड, सदस्य | |

माहे ऑक्टोंबर २०१७ ची अर्थ समिती सभा शुक्रवार, दिनांक १३.१०.२०१७ रोजी, दु.३.०० वाजता मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात आयोजती करणेत आली होती. त्यानुसार दिनांक १३.१०.२०१७ रोजी, दु.३.०० वाजता सभा सुरू करण्यात आली. प्रथम मा.श्री.निलेश रमेश गंधे सभापती अर्थ समिती, जि.प.पालघर यांनी उपस्थित सर्व सन्माननीय अर्थ समिती सदस्यांचे स्वागत करून समिती सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांना सभेचे कामकाज सुरु करणेस सांगितले.

त्यानुसार सभेचे सचिव श्री. एस.पी.पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांनी मा.सभापती यांच्या परवानगीने सभेचे विषय निहाय कामकाज सुरु केले.

**विषय क्रं. १.**

**(अ) मागिल अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.**

अर्थ समिती सभा दिनांक ०४.०८.२०१७ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सभागृहात सांगितले. याप्रमाणे दिनांक ०४.०८.२०१७ च्या इतिवृतामध्ये सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्याने इतिवृतास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**(ब) मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अमंलबजावणी बाबत.**

दिनांक ०४.०८.२०१७ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

**विषय क्रं. २.**

**जिल्हा परिषद पालघरचा माहे एप्रिल ते जुलै २०१७ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.**

पालघर जिल्हा परिषदेचे माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना सादर करणेत आले. अर्थ समितीचे सचिव श्री. एस.पी.पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदर जमा खर्च तक्यांमधील योजनांबाबत लेखाशिर्ष निहाय सविस्तर जमा व खर्चाची माहिती सभागृहास दिली.

सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली.

**विषय क्रं. ३.**

**भविष्य निर्वाह निधी लेखापरिक्षण अहवाल सन २०१५-१६ प्राप्त झाला असुन त्याच्या प्रथम अनुपालन अहवालास मान्यता देण्या बाबत.**

वित्त विभाग, जि.प. पालघर अंतर्गत भविष्य निर्वाह निधी शाखेचा स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडील सन २०१५-१६ च्या लेखापरीक्षण अहवालाचे अनुपालन सभागृहास सादर करणेत आले. सदर अहवालातील आक्षेपांबाबत सभागृहात चर्चा होवून सदर अनुपालनास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्रं. ४.**

**मा.सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्यावेळचे विषय.**

मा.सभापती यांच्या परवानगीने कृषि विभागाकडील पुढील विषय समिती पुढे सादर करणेत आला.

**विषय- जिल्हा परिषद निधी सन २०१७-१८ मध्ये योजनांचे पुर्नविनियोजन करणेबाबत.**

जिल्हातून रब्बी हंगामाकरीता हरभरा बियाणे उपलब्ध होणेकरीता मागणी प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना ५०% अनुदानाने बियाणे संच पुरवठा योजनेतंर्गत रब्बी हंगामाकरीता हरभरा बियाणे व भाजीपाला मिनिकीट उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. परतू सदर योजनेकरीता मुळ अंदाजपत्रक सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध तरतुद रक्कम रूपये १२५००००/- अपुरी असल्याने खालीलप्रमाणे पुर्नविनियोजन करुन मिळणेस विनंती आहे.

| अ.क्र | जि.प.सेस फंड योजनेचे नाव | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | सन -१७-१८ मधील संभाव्य खर्च | मुळ अंदाजपत्रकानुसार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी (-) लागणारी तरतुद | जास्त (+) लागणारी तरतुद |
| १ | ५०% अनुदानाने नैसर्गिक आपती व अचानक उदभवणाऱ्या किडरोगांचे नियंत्रण | १५,००,००० | १०,६४,६०० | ४,३५,४०० | ० |
| २ | शेतकऱ्यांना ५०% अनुदानाने बियाणे संच पुरवठा करणे | १२,५०,००० | १६,८५,४०० | ० | ४,३५,४०० |

सदर विषयाबाबत सभेत चर्चा होवून विभागाने विनंती केलेल्या निधीच्या पुनर्विनियोजनास सभेने मंजूरी देवून सदर पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव आगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे मंजूरी करीता सादर करणेस शिफारस करणेत आली.

या व्यतिरीक्त अर्थ समिती सभेत पुढील विषयांवर चर्चा करणेत आली.

**१.जिल्हा परिषद सदस्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

जिल्हा परिषद सदरस्यांचे मानधन अत्यल्प असल्याने सदर मानधनात वाढ करणेबाबत शासन स्तरावर सामान्य प्रशासन विभागा मार्फत पाठपुरावा करणेत यावा असे सभेचे अध्यक्ष श्री.गंधे यांनी सुचविले. याबाबात स्थायी समिती तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव पारीत करुन तो सामान्य प्रशासन विभागा मार्फत शासनास पाठवावा असे सुचविण्यात आले.

**२.जिल्हा परिषद सदस्यांच्या प्रशिक्षण दौऱ्याबाबत.**

शासन निर्णयानुसार प्रशिक्षण दौऱ्याकरीता प्रती सदस्य रक्कम रु.२,०००/- ची मर्यादा असल्याने केरळ येथील प्रशिक्षण संस्थेत जिल्हा परिषद सदस्यांना प्रशिक्षण खर्चाची मर्यादा शासनाकडून विशेष बाब म्हणून वाढवून घेता येईल. तसेच सदर खर्च जिल्हा परिषद स्व: उत्पन्नातून करणेत येणार असल्याने सामान्य प्रशासन विभागा मार्फत शासन स्तरावर पाठपुरावा केल्यास त्यास मंजूरी मिळू शकेल असे सभेचे अध्यक्ष श्री.गंधे यांनी सुचविले. याबाबात स्थायी समिती तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव पारीत करुन तो सामान्य प्रशासन विभागा मार्फत शासनास पाठवावा असे सुचविण्यात आले.

**३.अर्थ समिती सभेस विभाग प्रमुखांनी व्यक्तीश: उपस्थित रहाणेबाबत.**

आजच्या अर्थ समिती सभेस विभाग प्रमुखांच्या गैरहजेरीबाबत मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर व सन्मा.अर्थ समिती सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम १०९ (अ) नुसार या पुढील सर्व अर्थ समिती सभांना सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाच्या सविस्तर माहितीसह व्यक्तीश: उपस्थित रहाणे आवश्यक असल्याचे तसेच वित्त विभागामार्फत प्रत्येक अर्थ समितीची विषय पत्रिका सर्व विभागांस पाठवून व SMS व्दारे सर्व विभाग प्रमुखास अर्थ समिती सभेस उपस्थित राहणे बाबत कळविण्यात येते असे सभेचे सचिव श्री.पतंगे यांनी सभागृहास सांगीतले. याबाबात सर्व विभाग प्रमुखांना लेखी स्वरुपात सदर बाब कळवावी अशा सुचना सभागृहा मार्फत करणेत आल्या.

सभेपुढे चर्चेकरीता अन्य विषय नसल्याने सचिव श्री. एस.पी.पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा.सभापती यांचे परवानगीने सभेस उपस्थित अर्थ समिती सदस्य, विभाग प्रमुख व त्यांचे प्रती निधी यांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा. सभापती,**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष**
**जिल्हा परिषद पालघर**

# अर्थ समिती सभा दिनांक १३.१०.२०१७
## इतिवृत्त भाग -२

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| शुक्रवार, दिनांक १३.१०.२०१७ रोजी, दु.३.०० वाजता | **विषय क्र.१ (अ) मागिल सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.** | अर्थ समिती सभा दिनांक ०४.०८.२०१७च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सुचविले. दिनांक ०४.०८.२०१७ च्या इतिवृत्तामध्ये दुरूस्ती सन्मा. सदस्यांच्या सुचना नसल्यामुळे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. | मा.श्री.रामा जानु ठाकरे, सदस्या.<br>मा.श्रीम कल्याणी किशोर तरे , सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ७१ |
| | **विषय क्र.१ (ब) मागील ठरावाच्या अमंलबजावणी बाबत.** | दिनांक ०४.०८.२०१७च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. | मा.श्री. सुरेश बाबु कोरडा, सदस्या.<br>मा.श्रीम. रंजना किशोर संखे , सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | -- |
| | विषय क्र.०२.<br>**जिल्हा परिषद पालघरचा माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.** | पालघर जिल्हा परिषदेचे माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत.<br>सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस देण्यात येत आहे. | मा.श्रीम. पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्या<br>मा.श्री सुरेश ठक्या तरे, सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ७२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **विषय क्र.३**<br>**भविष्य निर्वाह निधी लेखापरिक्षण अहवाल सन २०१५-१६ प्राप्त झाला असुन त्याच्या प्रथम अनुपालन अहवालास मान्यता देण्या बाबत** | वित्त विभाग, जि.प. पालघर अंतर्गत भविष्य निर्वाह निधी शाखेच्या स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडील सन २०१५-१६ च्या लेखापरीक्षण अहवालाच्या प्रथम पुर्तता अनुपालनास ही अर्थ समिती सभा मंजूरी देत आहे. | मा.श्रीम कल्याणी किशोर तरे , सदस्या<br><br>मा.श्री सुरेश ठक्या तरे, सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | --- | ७३ |
| | **विषय क्र.४**<br>**जिल्हा परिषद निधी सन २०१७-१८ मध्ये योजनांचे पुनर्विनियोजन करणेबाबत.** | जिल्हातून रब्बी हंगामाकरीता हरभरा बियाणे उपलब्ध होणेकरीता मागणी प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना ५०% अनुदानाने बियाणे संच पुरवठा योजनेतंर्गत रब्बी हंगामाकरीता हरभरा बियाणे व भाजीपाला मिनिकीट उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. परतू सदर योजनेकरीता मुळ अंदाजपत्रक सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध तरतुद रक्कम रूपये १२५००००/- अपुरी असल्याने कृषि विभागाने प्रस्तावित केल्यानुसार ५०% अनुदानाने नैसर्गिक आपती व अचानक उदभवणाऱ्या किडरोगांचे नियंत्रण या लेखाशिर्षातर्गत तरतुद रक्कम रु.४,३५,४००/- कमी करुन ती पुर्नविनियोजनाव्दारे शेतकऱ्यांना ५०% अनुदानाने बियाणे संच पुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यास ही अर्थ समिती मंजूरी देत आहे. | मा.श्री.रामा जानु ठाकरे, सदस्या.<br><br>मा.श्रीम. रंजना किशोर संखे , सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | --- | --- | ७४ |

**सचिव अर्थ समिती**
**तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा.सभापती**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष,**
**जिल्हा परिषद पालघर**